


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •




• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २५२ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.१९ जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# विधानसभा अध्यक्षांचा मोठा निर्णय: अधिवेशन काळात केवळ आमदार,स्वीय सहाय्यक,अधिकाऱ्यांनाच प्रवेश

## अभ्यागतांच्या वर्तणुकीची जबाबदारी देखील त्या आमदारांवर; मंत्र्यांनाही बैठका घेण्यास बंदी

**मुंबई (वृत्तसंस्था)–विधानसभा अध्यक्षांनी काल झालेल्या हाणामारीच्या घटनेनंतर मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे विधान भवन परिसरामध्ये अधिवेशन चालू असताना केवळ आमदार, त्यांचे स्वीय सहाय्यक आणि अधिकाऱ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. काल झालेल्या हाणामारीच्या घटनेनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कठोर भूमिका घेत, हा निर्णय आज जाहीर केला.विधानसभा अध्यक्षांच्या आदेशानुसार आता आमदारांच्या खासगी कर्मचाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना अधिवेशन सुरु असताना विधिमंडळ परिसरामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. इतकेच नाही तर अधिवेशन काळात विधिमंडळातील सभागृहांमध्ये मंत्र्यांना बैठका न घेण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले आहेत. मंत्र्यांनी त्यांच्या मंत्रालयातील दालनात या बैठका घ्याव्यात, असे देखील अध्यक्षांनी सांगितले आहे.आमदारांच्या नैतिक आचरणाचे उच्च मापदंड राखण्यासाठी लोकसभेच्या धर्तीवर नीती मूल्य समिती गठीत करण्याचा विचार असल्याचे राहुल नार्वेकर यांनी म्हटले आहे. त्यासाठी विधान परिषदेच्या सभापतींशी विचार विनिमय करून तसेच गटनेत्यांशी चर्चा करुन, या विषयाचा निर्णय पुढील आठवड्यात घेण्यात येणार असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले आहे.**



यावेळी राहुल नार्वेकर यांनी सांगितले की, बऱ्याच वेळा मंत्र्यांच्या वतीने देखील विधिमंडळाच्या सभागृहांमध्ये बैठका आयोजित करण्यासाठी अभ्यागतांना प्रवेश देण्याची विनंती करण्यात येते. मात्र, आता त्यांना त्यांच्या बैठका या मंत्रालयातील त्यांच्या दालनात घ्याव्या लागतील. अत्यंत महत्त्वाच्या परिस्थितीत, माननीय अध्यक्ष आणि सभापती यांचा समावेश असलेल्या मंडळाची मान्यता घेतल्याशिवाय मंत्र्यांना देखील विधानमंडळात बैठक घेण्याचे आणि अभ्यागतांना प्रवेश देण्याची परवानगी देण्यात येणार नाही, असे देखील नार्वेकर यांनी स्पष्ट केले.या विषयी बोलताना विधानसभा अध्यक्ष म्हणाले की, सर्वांचे उत्तरदायित्व हे संविधानाशी आहे. संविधानानुसार आपले विधानमंडळ आणि इतर सर्व संस्था आहेत. विधिमंडळाचे सदस्य म्हणून शपथ घेताना आपण संविधानाबद्दल खरी श्रद्धा, निष्ठा बाळगण्याची व कर्तव्य निष्ठापूर्वक पार पाडण्याची शपथ घेतली आहे. त्याचे काटेकोरपणे पालन करणे अपेक्षित आहे. त्या दृष्टिकोनातून विधिमंडळ परिसरामध्ये अधिवेशन काळात कालावधीत यापुढे केवळ सन्माननीय सदस्य त्यांचे अधिकृत स्वीय सहाय्यक आणि शासकीय अधिकारी यांनाच केवळ प्रवेश देण्यात येईल. इतर अभ्यागतांना प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच आमदारांसोबत येणाऱ्या अभ्यागतांच्या वर्तणुकीची जबाबदारी देखील त्या आमदारांवर निश्चित करण्यात येणे आवश्यक असल्याचे अध्यक्षांनी म्हटले आहे.

# विजेमुळे मृत्यूमुखी पडलेल्या शेतमजुराच्या कुटुंबाला आ.करण देवतळे यांचा मदतीचा हात

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोसरसार–मकसुर शेतशिवारात (दि. १७ जुलै) दुपारी दीड वाजताच्या सुमारास वीज कोसळून शेतमजूर रावबा दादाजी मंगाम यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पराठीच्या खुरपणीचे काम करत असताना अचानक विजेचा कडकडाट झाला आणि त्यांच्या अंगावर वीज कोसळल्याने घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.

रावबा मंगाम हे शेतमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांचा अचानक मृत्यू झाल्यामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे.या घटनेची माहिती मिळताच प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते गणेश उराडे यांनी वरोरा–भद्रावती विधानसभा क्षेत्राचे आमदार करण देवतळे यांच्याशी संपर्क साधून कुटुंबाची स्थिती सांगितली व तातडीने मदतीची विनंती केली. आमदार देवतळे हे त्या वेळी अधिवेशनात सहभागी होते. त्यांनी त्वरित आपल्या स्वीय सहाय्यकाला संपर्क करून मदतीचे निर्देश दिले. त्यानुसार आमदार देवतळे यांचे स्वीय सहाय्यक उपजिल्हा रुग्णालयात पोहोचले व मंगाम कुटुंबातील सदस्यांना आर्थिक मदत सुपूर्त केली. यावेळी गावातील तंटामुक्ती अध्यक्ष नितीन मायकरकार, सरपंच गणेश मडावी, प्रहारचे गणेश उराडे उपस्थित होते.



# आदिवासी विद्यार्थ्यास शिवसेनेचा दिलासा; आर्थिक मदतीसाठी पुढाकार

**पालघर । नितीन बोंबाडे**

वनई भावरपाडा गावातील आदिवासी युवक विरेंद्र किसन उमतोल हा ल. जे. राऊत आयटीआय, चिंचणी येथे इलेक्ट्रिशियन अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे.

घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती असल्याने ३०,००० रुपयांची फी भरणे त्याच्यासाठी अशक्य झाले होते. यातले काही पैसे त्याने बोईसर येथे मजुरी करून भरले होते, मात्र उर्वरित फी न भरल्याने मुख्याध्यापकांकडून सतत फी भरण्याची मागणी होत होती.या परिस्थितीत निराश झालेल्या विरेंद्रने युवा एल्गार आघाडीच्या चिंचणीतील कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाने वाणगाव येथील ड. विराज गडग यांची भेट घेतली आणि



आपली अडचण सांगितली.विद्यार्थ्याची परिस्थिती समजताच ड. विराज गडग यांनी शिवसेना पालघर जिल्हाध्यक्ष कुंदन संखे आणि तालुका अध्यक्ष हेमंत धर्ममेहर यांच्याशी संपर्क साधून मदतीसाठी विनंती केली. दोघांनीही सकारात्मक प्रतिसाद देत विरेंद्रला पालघर येथील शिवसेना कार्यालयात बोलावले आणि आर्थिक मदत दिली.तसेच पुढील शिक्षणासाठीही आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले.

या वेळी जिल्हाध्यक्ष कुंदन संखे, तालुका अध्यक्ष हेमंत धर्ममेहर, ड. विराज गडग, अजय वायेडा, रोहित किणी, चिन्मय उंबरकर, विशाल जाधव आदी उपस्थित होते.शिवसेनेच्या मदतीमुळे दिलासा मिळालेल्या विरेंद्रने सर्वांचे मनापासून आभार मानले. शिक्षणासाठी झगडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी समाजाने उभे राहण्याची गरज यानिमित्ताने अधोरेखित झाली आहे.

# शिवसेना शिंदे गट आणि रिपब्लिकन सेनेची युती फुले शाहू, आंबेडकरांच्या विचारसरणीच्या विरोधात आहे

## शिंदे यांच्या हातचे बाहुले बनण्यात वयक्तिक आणि आर्थिक फायदा मिळाला का?

## वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकरांचे मोठे विधान

**मुंबई । विराम पवार**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात ऐतिहासिक युती घडून आली आहे. मात्र ही युती होताच प्रकाश आंबेडकर यांनी मात्र आनंदराज आंबेडकर यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत.शिवसेना शिंदे गट आणि रिपब्लिकन सेना यांच्यात युती होताच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी रिपब्लिकन सेना शिंदेसोबत गेल्याने संबंध तोडले आहेत. शिंदे यांच्या हातचे बाहुले बनण्यात वैयक्तिक आणि आर्थिक फायदा मिळाला का? असा प्रश्न वंचितने आनंदराज आंबेडकर यांना केला आहे.

रिपब्लिकन सेनेने भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेसोबत युती केली आहे. ही युती फक्त संविधान वाचवण्यासाठीच्या लढाईविरुद्धच नाही, तर ही युती फुले शाहू आंबेडकरांच्या विचारसरणीच्याही विरोधात आहे. आनंदराज आंबेडकर यांच्या निर्णयामुळे आम्हाला फक्त निराशाच झालेली नाही तर हे वेदनादायक आहे. आम्ही विचार करतोय की, आनंदराज आंबेडकर यांनी सत्तेसाठी भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेशी युती केली आहे की? यातून भाजपा आणि आरएसएसच्या अजेंड्याला लपवण्यासाठी ही युती करण्यात आली आहे? कोणाच्यातरी हातचे बाहुले बनून एससी, एसटी, ओबीसी, अल्पसंख्याक, विशेषत: बौद्ध आणि मुस्लिमांविरूद्धच्या आरएसएसच्या गुन्ह्यांना आणि अजेंड्यांना पाठीशी घालण्यासाठी ही युती करण्यात आलीय का? हातचे बहुले बनण्याच्या बदल्यात काही वैयक्तिक आणि आर्थिक फायदा मिळालाय का? असा सवालही



वंचितने आनंदराज आंबेडकर यांना केला आहे.यावर रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी देखील पलटवार केला आहे. वंचितच्या या आरोपांना आनंदराज आंबेडकर यांनी उत्तर देत, जे मला कार्यकर्ते ओळखतात त्यांना माहिती आहे की, आजपर्यंत माझं काम हेच माझं बोलणं आहे. त्यामुळे लोकांना माहिती आहे की या अशा गोष्टीनां मी फार किंमत देत नाही. मी स्वतः आर्थिक सक्षम आहे. अशा फालतू आरोपांवर आंबेडकरी जनता विश्वास ठेवणार नाही.कार्यकर्त्यांना कुठेतरी सत्तेच्या परिघामध्ये आणण्यासाठी ही युती करण्यात आली आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी सत्तेत बसावे हाच आमचा प्रयत्न आहे. भाजप आणि आरएसएसचा जो अजेंडा आहे त्याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. जो कोणी संविधानाला हात लावेल तेव्हा आम्ही रस्त्यावरती उतरायला मागे पुढे पाहणार नाही. त्यामुळे जे आरोप करण्यात आलेले आहेत, त्यावर लोकांचा विश्वास नाही. माझ्याशी प्रत्येक जिल्ह्यामधल्या वंचितच्या कार्यकर्त्यांनी संपर्क साधलेला आहे. आज अनेक लोक रिपब्लिकन सेनेमध्ये येण्यासाठी तयार आहेत.

# कोणाच्या हातात दिला आहे महाराष्ट्र? विधिमंडळातील राड्या वर राज ठाकरेंचा संतप्त सवाल

**मुंबई । विराम पवार**

राज्यातील पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विधिमंडळ परिसरात झालेल्या धक्कादायक हाणामारीच्या प्रकारावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या एक्स (पूर्वीचे ट्विटर) खात्यावरून संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. कोणाच्या हातात दिला आहे महाराष्ट्र .असा सवाल करत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर सडकून टीका केली. थोडी जरी साधनशुचिता शिल्लक असेल, तर तुमच्या स्वतःच्या लोकांवरही कारवाई करून दाखवा, असे आव्हान त्यांनी फडणवीस सरकारला दिले आहे.विधानभवनाच्या परिसरात झालेली गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांतील धक्काबुक्की आणि राडा हे महाराष्ट्राच्या संसदीय परंपरेला काळीमा फासणारे असल्याचे मत व्यक्त करत, राज ठाकरे म्हणाले, आज जर अशा लोकांना माफ केलं गेलं, तर उद्या विधानभवनात आमदारांचे खून पडले, तरी आश्चर्य वाटणार नाही!राज ठाकरेंनी माध्यमांच्या दिशेनेही बोट दाखवत म्हटले की, हे सर्व प्रकार मुद्दाम करून माध्यमांचं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न आहे. अधिवेशनाची एक दिवसाची किंमत दीड ते दोन कोटी रुपये असताना, ते केवळ व्यक्तिगत शेरेबाजी आण बिनमहत्त्वाच्या वादांसाठी वाया घालवले जात आहेत.ते पुढे म्हणाले, सत्ता हे साधन असावं, साध्य नव्हे हे विसरून जे कोणी गलिच्छ राजकारण करत आहेत, त्यांना जनता आता ओळखू लागली आहे. मराठी भाषेच्या सन्मानासाठी त्यांनी पुन्हा एकदा आपली भूमिका स्पष्ट करत सांगितले, माझा महाराष्ट्र सैनिक मराठी भाषेचा अपमान सहन करणार नाही, आणि जर सरकार कारवाई करत नसेल, तर आम्ही करतो.राज ठाकरेंच्या या पोस्टमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, सोशल मीडियावरही त्यांच्या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू आहे. विधिमंडळात होणाऱ्या चर्चांपेक्षा विधिमंडळाच्या बाहेर घडणाऱ्या घटनांनीच लोकशाहीची प्रतिमा धुळीस मिळत आहे, हीच वस्तुस्थिती असल्याचेही ठाकरे यांचे सूचक वक्तव्य अनेकांना विचार करायला भाग पाडत आहे.



## सह्याद्रीचा राखणदार वृत्तपत्र व न्यूज चॅनल

### चंद्रपूर जिल्हा कार्यालयासाठी मनुष्यबळ आवश्यक पद

१.सखी सह्याद्री फोरम – डिस्ट्रिक्ट कॉर्डिनेटर
२.युवा सह्याद्री फोरम – डिस्ट्रिक्ट कॉर्डिनेटर
यूज अँकर
३.रिपोर्टर (जिल्ह्यातील चंद्रपूर, बल्लारपूर, राजुरा , कोरपना, जिवती, ४.पोंभुर्णा, सावली , सिंदेवाही, नागभीड, ब्रम्हपुरी, चिमूर , भद्रावती तालुका )
पत्रकारिता, नेतृत्व व सामाजिक कार्यात रुची असणाऱ्यांसाठी उत्तम संधी!

:: संपर्क करा ::
९०११७०८८४०
९२७०१३१५८०

# शेतकरी कुटुंबाच्या घरात घुसून १९ वर्षीय तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला; प्रज्वल पवार आयसीयूमध्ये

**शिरूर । रमेश बनसोडे**

मांडवगण फराटा (ता. शिरूर, जि. पुणे) येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबावर १६ जुलैच्या रात्री दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या राहत्या घरात घुसून भयानक हल्ला केला. या हल्ल्यात १९ वर्षीय प्रज्वल दिगंबर पवार गंभीर जखमी झाला असून तो सध्या आयसीयूमध्ये जीवनमरणाच्या झुंजीत आहे.

घटना रात्री साडे नऊच्या सुमारास अकरावा मळा परिसरात घडली. पवार कुटुंब दिगंबर पवार, पत्नी राजश्री आणि मुलगा प्रज्वल हे तिघे स्वयंपाकघरात जेवत होते. त्या वेळी अचानक दोन अनोळखी इसम घरात घुसले. एकाच्या हातात गनसदृश वस्तू होती, तर दुसऱ्याच्या हातात धारदार शस्त्र.

हा अनपेक्षित प्रसंग पाहून घरच्यांना भयंकर धक्का बसला. प्रज्वल उठून त्या अज्ञात हल्लेखोरांना थोपवण्याचा प्रयत्न करत असतानाच त्याच्या मानेवर व गळ्यावर सपासप वार करण्यात आले. काही क्षणांतच तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. हल्लेखोर रानातून पसार झाले.घटनेनंतर पवार कुटुंबाने तातडीने नातेवाईकांना संपर्क करून मदत मागितली. प्रज्वलला गंभीर अवस्थेत मांडवगण येथील वरद विनायक रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तो आयसीयूमध्ये आहे.आई राजश्री पवार यांनी अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी पोलिसांसमोर दिलेला जबाब अत्यंत हृदयद्रावक होता. मी मुलाला जेवण वाढत होते... आणि काही क्षणांत माझ्या डोळ्यांसमोर त्याचा जीव गेला असता. आम्ही कुणाचा काय बिघडवलं होतं. असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सध्या पोलिस तपास सुरू असून, सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिक नागरिकांकडून माहिती घेतली जात आहे. अद्याप आरोपींचा ठावठिकाणा लागलेला नाही.या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. साधं सरळ जीवन जगणाऱ्या शेतकरी कुटुंबावर अशा प्रकारचा हल्ला होणं ही माणुसकीची आणि कायद्याची पायमल्ली असल्याचं ग्रामस्थांचे मत आहे.प्रज्वल पवार या तरुणावर हल्ला करणाऱ्यांना तातडीने अटक करून कडक शासन करावं, अशी जोरदार मागणी नातेवाईक आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. पोलिस प्रशासनाने लवकरात लवकर न्याय द्यावा, हीच संपूर्ण गावाची अपेक्षा आहे.



# देवांशु शिंगरू : एका चैतन्याचा, एका स्वरांचा आणि एका आशेचा शिल्पकार!

## माँ की दुआ ने दिया साथ, बाप की मेहनत बनी राह, जब दोनों मिल जाएं तो, फिर तबला क्या, खुदा भी बज उठे वाह!



**काही जीवनकथा मनाच्या खोल गाभ्याला भिडतात. त्या केवळ गोष्टी नसतात, तर त्या काळजाला चटका लावतात आणि डोळ्यातून आशेचे अश्रूही ओघळवतात. चंद्रपूरच्या देवांशु शिंगरूची जीवनगाथा ही अशाच एका विशेष मुलाची आहे जिच्यात विलक्षण कला, अपार जिद्द आणि पालकांच्या नि:स्वार्थ समर्पणाचा सुवास आहे. हे केवळ त्याचं यश नाही, तर हजारो दिव्यांग मुलांसाठी प्रकाशाचा दीप ठरलेली प्रेरणादायी गाथा आहे. देवांशु या नावातच दैवी स्पर्श आहे. ११ नोव्हेंबर २००५ रोजी जन्माष्टमीच्या पावन दिवशी जन्मलेल्या या चिमुकल्याच्या जीवनात, जन्मत: आलेल्या अडचणी, शारीरिक मर्यादा आणि बौद्धिक आव्हानं यामुळे बालपण खडतर होतं. चालणं, बोलणं, समजून घेणं या प्रत्येक कृतीसाठी त्याला आधाराची गरज असायची. ही परिस्थिती मेघना आणि राकेश शिंगरू यांच्यासाठी अत्यंत कठीण होती. पण त्यांच्या मनात होता आशेचा एक शाश्वत दीप. एक दिवस आईने देवांशुला दरवाज्यावर तालबद्ध ठोके मारताना पाहिलं. त्या एका क्षणी मेघना शिंगरू यांच्या अंत:करणात उमटली कलात्मक शक्यतेची पहिली झलक. जणू काळोखात एखादा हिरा सापडावा, तसा अनुभव होता तो. त्या दिवसापासून सुरु झाला एक चिरकालकाळ टिकणारा सुरांचा प्रवास. मेघना आणि राकेश शिंगरू यांनी समाजाच्या रूढ चौकटींना बाजूला ठेवून आपल्या मुलाला प्रेम, समज आणि आत्मविश्वास दिला. चंद्रपूरमध्ये मेघना कार डेकोर या नावाने व्यवसाय करणारे राकेश शिंगरू आर्थिक जबाबदाऱ्या सांभाळत देवांशुच्या कलेसाठी आवश्यक ती प्रत्येक गोष्ट पुरवत राहिले.**

**मेघना शिंगरू यांनी तर आईपणाच्या पलीकडे जात आपले मातृत्व कलागुरुच्या भूमिकेतही पार पाडले. त्या म्हणतात, माझं मूल वेगळं आहे, पण त्याचा प्रत्येक ठोका हा त्याच्या आत्म्याचा आवाज आहे.या वाक्यात त्यांच्या प्रेमाची आणि श्रद्धेची गहराई स्पष्ट होते. २०१७ पासून देवांशु आपल्या आजी ज्योती पारधी यांच्यासह पुण्यात स्थायिक झाला. आजीच्या मायाळू हातांनी आणि अथक परिश्रमांनी त्याला नवे बळ मिळाले. तिथून त्याच्या संगीतमय प्रवासाला अधिक दिशा मिळाली. पुण्याच्या सांस्कृतिक वातावरणात वाढत असताना त्याने अनेक संधी मिळवल्या आणि आपल्या कलागुणांना नवे पंख लावले. आजीच्या मायेचा आणि मार्गदर्शनाचा हात त्याच्या वाटचालीस कायमच प्रेरणा देणारा ठरला. लहान वयातच देवांशुने ताल, लय, आणि नाद यांचं गूढ आत्मसात करायला सुरुवात केली. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनात त्याचा तबल्याचा अभ्यास सुरु झाला. त्याचे हात जरी हळवे असले, तरी त्यातून उमटणारा आवाज अत्यंत सशक्त होता. प्रत्येक ठोका हा त्याच्या अंतर्मनातील भावना, स्वप्न आणि संघर्षांचं प्रतीक बनत गेला. अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या विशेष अभ्यासक्रमात देशभरातील मतिमंद विद्यार्थ्यांमध्ये देवांशुने प्रथम क्रमांक मिळवला. प्रविण स्तरासह त्याने ही परीक्षा उत्तीर्ण केली. हे केवळ गुणपत्रक नव्हे, तर हजारो अपंग मुलांच्या क्षमतांवरचा ठसा होता एक शाश्वत ठसा जो समाजाच्या दृष्टिकोनात परिवर्तन घडवणारा ठरतो.**



देवांशुचं पहिलं सादरीकरण स्वप्न स्वरांचे या कार्यक्रमात झालं आणि तेथूनच सुरांची झेप सुरू झाली. कला सहयोग, उडान, नृत्य दामिनी भरतनाट्यम, दीपोत्सव, कला प्रसारक दिवाळी पहाट, विश्व पृथ्वी दिवस महोत्सव अशा विविध नामांकित कार्यक्रमांमध्ये त्याने आपली कला सादर केली. प्रत्येक मंचावर त्याने उपस्थितांची मने जिंकली. गोव्यातील इंटरनॅशनल पर्पल फेस्टिवल मध्ये जगभरातून आलेल्या रसिकांसमोर त्याचं तबलावादन झालं आणि उपस्थितांनी उभं राहून त्याला सलाम ठोकला. त्या दिवशी देवांशु फक्त एक कलाकार नव्हता, तो भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा सजीव प्रतीक बनला होता केवळ दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये नव्हे, तर सामान्य विद्यार्थ्यांच्या गटातही देवांशुने स्वत:ची गुणवत्ता सिद्ध केली. कला प्रसारक सारख्या कार्यक्रमांमध्ये त्याने पुरस्कार मिळवत सर्वसामान्य विद्यार्थ्यांमध्ये आपली कला आणि क्षमता सिद्ध केली. त्याने स्पष्ट केलं की प्रतिभा ही कोणत्याही गटाची गुलाम नसते. वाद्य वादनासोबतच देवांशुने जलतरणातही नाव कमावलं. मालवण येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील सी स्विमिंग स्पर्धेत त्याने ब्रॉन्झ मेडल पटकावलं. स्पेशल ऑलिम्पिक ऑस्ट्रेलिया साठी त्याची निवड झाली होती. दुर्दैवाने कोविड-१९ महामारीमुळे स्पर्धा रद्द झाली, अन्यथा तो देशासाठी आणखी एक पदक घेऊन आला असता, याची खात्री प्रशिक्षकांनी व्यक्त केली. प्रसिद्ध तबलावादक दत्तात्रय भावे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या देवांशु पुण्यात तबल्याचं अधिक सखोल शिक्षण घेत आहे. दररोज नवनवीन ज्ञान मिळवत, स्वत:ची कला अधिक संपन्न करत, तो केवळ वाजवत नाही तर संगीत जगतो आहे. देवांशुची कहाणी समाजाला शिकवते की दिव्यांगत्व म्हणजे दुर्बलता नव्हे, तर ती विशेष क्षमतेचं रूप असू शकतं. गरज असते ती योग्य संधी, प्रामाणिक मार्गदर्शन आणि पालकांचा अढळ पाठिंबा. प्रत्येक मुलात एक अद्वितीय सूर असतो त्याला ऐकण्यासाठी आपल्याला काळजी, संयम आणि प्रेमाचे कान हवे असतात. मेघना शिंगरू म्हणतात तो दरवाजावर ठोके देत होता, आणि मला जाणवलं तो जगाला काहीतरी सांगू पाहतोय. आम्ही त्याचा आवाज होण्याचं ठरवलं. राकेश शिंगरू सांगतात व्यवसाय आमचं जीवनचक्र आहे, पण देवांशुचं यश हे आमचं खऱ्या अर्थानं जीवनधन आहे. देवांशु शिंगरूच्या तबल्याचे ठोके केवळ वाद्य नाहीत, ते लढ्याचे रणवाद्य आहेत. ते अपूर्णतेवर मात करून संपूर्णतेच्या दिशेने झेप घेणाऱ्या मुलांसाठी आशेचे वादळ आहेत.

**जब इरादे हों फौलादी,**
**राहें बन ही जाती हैं,**
**तबले के हर ठोके में,**
**जिंदगी मुस्कुराती है।**



अमोल कडुकर
(चंद्रपूर)



# खेळांद्वारे महिलांचे सक्षमीकरण

यत्र नार्यस्तू पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता म्हणजेच, स्त्रियांचा सम्मान केला सध्याची परिस्थिती लक्षात घेता महिला सक्षमीकरण ही किती न केला जातो, नियेच देवना निवासू करसान महत्वाची बाब आहे, हे आपल्या लक्षात येते. महिला सक्षमीकरणासाठण आपल्याला काहीना काही उपाययोज उपाययोजना बुख्याची सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना स्वत:चे निर्णय घेण्यास सक्षम बनवणे. व्याची गरज आहे. महिला अनेक शतकापूर्वी स्त्रियांचे अस्तित्व आस्तत्वातच नव्हते. पण जसजसी वेळ निधत गेली तसतसे स्त्रियांना त्यांचे अस्तित्व आणि शकती जाणवली. तेव्हापासून आजपर्यंत महिलांच्या सामाजिक उन्नतीसाठी चळवळी केल्या जात आहेत. आणि त्यातलीच एक नधीन चळवळ म्हणजेच खेळांद्वारे महिलांचे सक्षमीकरण, खेळांद्वारे महिलांचे सक्षमीकरण ही एक चांगली संकल्पना आहे. खेळांमध्ये सहभाग करुण स्त्रि आत्मविश्वास वाढतो तसेच वैयक्तीक सुरक्षा करख्याचे बळ आपल्यात येते महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ असा आहे की महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव फरुण देव्याबरोबरच त्यांना त्यांचे सर्व निर्णय स्वता घेण्यास प्रेरित करणे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारावर आवाज उठवणे. खेळामुळे महिलांच्या आत्मविश्वासान वाढ होते. खेळाडू महिला त्यांच्या करिअरला अधिक महत्त्व देतात. इतर महिलांप्रमाणे त्या लवकर लग्न करणे या गोष्टीकडे काही फाळ दुर्लक्ष करतात, तसेच खेळामुळे शरीराची हालचाल होते, ज्यामुळे सुदृढ राहते. आणि लवचिकताही वाढते. तसेच यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वासाबरोबरच संघटनकौशल्यही वाढते त्याचा फायदा त्यांच्या के दैनंदिन जीवनातही पासयला मिळतो.

**सशक्त नारी सुखी परिवार भारी को भी दे समानना का अधिकार**

व्यैयक्तीक सुरक्षा आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी विविध खेलांमध्ये स्त्रियांनी सहभाग घेणे फार महत्त्वाचे आहे.

अलिकडच्या वर्षात, क्रिडा क्षेत्रात महिलांचे महत्त्व चान्त आहे. ऐतिहासिकदृष्ट्या खेळांमध्ये पुरुष खेळाडूचे वर्चस्व आहे, महिलांच्या सहभागाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागता खेळांमध्ये महिलांचे सशक्तीकरण हे केवळ मुलींमध्ये शारीरिक हालचालींना प्रोत्साहन देण्यापलीकडे आहे. खेळाद्वारे सक्षमीकरण तरुण मुलींना पुर्वग्रहाला न धाबरना त्यांना मजबून बनवते. व परिस्थत्ती-की-ला समोर जाण्याची शक्ती देते.खेचाद्वारे महिला सक्षमीकरण ही एक अत्यंत उपयुक्त संकल्पना आहे. यादूवार महिलांचे सक्षमीकरण कसे होते हे आपण जाणून घेऊया.

**शारीरिक आरोग्य आणि कल्याण**

खेळातील सहभाग महिला विद्यार्थ्यांना अनेक शारीरिक आरोग्य लाभ देते. नियमित शारीरिक क्रियाकलाप निरोगी वजन राखव्यास, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य सुधारण्यास आणि जुनाट आजारांचा धोका कमी करण्यास मदत करते खेळात गुंतव्यासाठण प्रोत्साहित केल्याने निरोगी जीवनशैलीच्या सवयी निर्माण होतात ज्या आयुष्यमर टिकू शकतात.

**भावनिक आणि मानसिक आरोग्य फायदे**

शारीरिक फायदयांच्या पलीकडे, क्रिडा महिला विव्याच्य भावनिक आणि मानसिक

कु. श्रुती रविंद्र धोटे
राष्ट्रीय खेळाडू
(MSc द्वितीय वर्ष) आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन



आरोग्यासाठी महत्त्वपुर्ण योगदान देतात. शारीरिक क्रियाकलाप एंडोर्फिन सोडतात, जे तणाव तणाव आणि चिंता कमी करू शकतात शिवाय, संघाचा भाग असल्याने आपुलकीची आणि सौहार्दाची भावना निर्माण होते, मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो नेतृत्व आणि टीमवर्क कौशल्यांचा विकास :सांधिक खेळातील सहभाग नेतृत्व आणि सांधिक कार्य कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी प्रदान करतो. खेळात गुंतलेल्या महिला एक संघ म्हणून सहयोग कसे करायचे, प्रभावीपणे संवाद साधायचे आणि आव्हाने कुत्ती हाताळायची हे शिकतात. ही कौशल्ये जीवनाच्या विविध पैलूंमध्ये हस्तांतरित कुरख्यायोग्य आहेत, व्यैयक्तीक आणि व्यावसायिक वाढीस

**हातभार लावतात. आत्मविश्वास वाढवणे**

खेळ केवळ शारीरिक तंदुरुस्तीच विकसित करत नाही तर लवचिकता, शिस्त आणि मानसिक बळ देखील विकास्नेत पुरतो. जीवनाच्या आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ देतो. यातून आत्मविश्वासाची भावना निर्माण होते.आपण एका अशा भविष्याची कल्पना करू शकतो जिचे भारतातील प्रत्येक मुलीला खेळांची परिवर्तनीय शकती अनुभवायची शक्ती मिळेल. एकत्रितपणे, आपण सशक्त, आत्मविश्वासू आणि सशक्त तरुण स्त्रियांची एक पिढी तयार करू शकतो जी एक उज्ज्वल उदया घडवेल. शाळेतील महिलांना खेळाडूंना सक्षम बनवण्यासाठी क्षेत्रातील स्त्री-पुरुष समानतेबद्दल आगस्कता घोरणे : क्रिडा निर्माण करणे हे किडा क्षेत्रातील से महिलांना सक्षम बनवण्याचे एक मुलभूत पाऊल आहे. शैक्षणिक संस्था असे कार्यक्रम राबवू शकतात जे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना किडा क्षेत्रातील महत्त्व पटवून देईल.महिला खेळाडूंच्या सक्षमीकरणासाठी किडा सुविधा, उपकरणे आणि संसाधनांमध्ये समान प्रवेश सुनिस्चित करणे महत्त्वाचे आहे. शाळांनी अशा सुविधांमध्ये गुंतवणूक केली पाहिजे जी पुरुष आणि महिला खेळाडूंच्या गरजा पूर्ण करतात आणि सर्वसमावेखु आणि सहाय्यक वातावश्वास प्रोत्साहन देण्यासाण संसाधनांचे योग्य वाटप करतात

महिला खेळाडूसणि मार्गदर्शन कार्यक्रम तयार करणे, (मेंटॉशरीपू) प्रोगाम महिला खेळाडूंना सक्षम बनवण्यात महत्त्वाची भुमिका बजावू शकतात. क्रिडा क्षेत्रातील महत्त्वाकांशी महिलांना अनुभवी मार्गदर्शकांसोबत जोडून मार्गदर्शन, समर्थन, आणि क्रिडा क्षेत्रातील महिला असण्याच्या आव्हांनोना 'नेव्हिगेट' कख्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करु शकतात. मार्गदर्शन, समर्थन आणि किडा क्षेत्रातील महिलांना असणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करू शकतात महिला खेळातील सकारात्मक रोल मॉडेल्सना प्रोत्साहन देने:महिला क्रिडापट्रेच्या पुढील पिढीला प्रेरणा देण्यासाठी महिला क्रिडा क्षेत्रातील सकारात्मक रॉल मॉडेल्स अधोरेखित करणे आवश्यक आहे. फिडा क्षेत्रातील यशस्वी महिलांच्या पुरणे, मग ते खेळाडू प्रशिक्षक किंवा प्रशासक उत्सव साजरा

या नात्याने, प्रतिमेला कोणतेही लिंग माहित नसते आणि स्त्रिया कोणत्याही किडा शाखेत उत्कृष्ट कामगिरी कुरू शकतात हा संदेश अधिक मजबूत करतो.महिला खेळाडूंच्या सक्षमीकरणासाठी शाळांमध्ये समानता आणि आदराची संस्कृती निर्माण करणे हे. मूलभूत आहे. यामध्ये लिंग-आधारित भेदभावासाठी शुन्य - सहिष्वा धोरणाचा प्रचार करणे, सर्व विदयार्थ्यांना मुल्यवान वाटेल अशा बातावरणाला प्रोत्साहन देणे आणि क्रिडा कार्यक्रमांमध्ये न्याय वागणुकीच्या महत्वाषर जोर देणे समाविष्ट आहे.सक्षमीकरण्यासाठण क्रिडा क्षेत्रातील महिलांच्या शाळा पालक आणि समुदायांकडून सतत पाठिंबा देणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टी वरून असा निष्कर्ष निघतो. को खेळांद्वारे महिलांचे सक्षमीकरण ही एक चांगली संकल्पना असून यावर सर्वांनी विचार करायला हवा. वैयक्तीक सुरक्षा तसेच आत्मविश्वास वाढवण्याचे काम खेळाद्वारे होते. महिला खेळाईना सशक्त बनवण्याचा सकारात्मक परिणाम केवळ त्यांच्या ॲथलेटिक कामगिरीवरच नव्हे तर त्यांच्या वैयक्तीक आणि व्यावसायिक जीवनातही दिसून येतो.

## वीज पोल व तारा कोसळल्याने गोळवाडीतील शेतकऱ्यांचे पिकांना फटका; नुकसानभरपाईची मागणी



**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी शिवारात गट क्रमांक २४ मध्ये वीज वाहिन्यांचे पोल व तारा अचानक तुटून पडल्याने शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा फटका बसला असून, शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईची जोरदार मागणी केली आहे.

रावसाहेब मिसाळ यांच्या शेतात घडलेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण भागाचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. परिणामी मोटारपंप बंद पडले असून, शेतकऱ्यांना आपल्या पिकांना वेळेवर पाणी देता आलेले नाही. सध्या खरीप हंगाम सुरू असून, अशा वेळी पाणी न मिळाल्याने सोयाबीन, मका, कापूस अशा पिकांवर नकारात्मक परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

घटनास्थळी पाहणी केल्यानंतर काही ठिकाणी वीजतारा जमिनीवर पडून आगीच्या ठिणग्या उडाल्याचे निदर्शनास आले असून, शेतातील काही भाग जळाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या सर्व प्रकारांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रावसाहेब मिसाळ यांनी यासंदर्भात सांगितले, महावितरणकडे गेल्या अनेक महिन्यांपासून तक्रारी करूनही जुने, झुकलेले पोल बदलण्यात आले नाहीत. वारंवार पाठपुरावा करूनही दुरुस्तीची कोणतीही कारवाई झाली नाही. आज त्याचे परिणाम आम्हाला भोगावे लागत आहेत.घटनेची माहिती मिळाल्यानंतर महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले, मात्र त्यांनी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही सुरू केलेली नाही. शेतकऱ्यांनी या संदर्भात प्रशासनाकडे लेखी निवेदन देऊन तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची आणि नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे.

# बांधकाम कामगारांसाठी दिलासा! आता नोंदणी साठी ठेकेदाराचे ९० दिवसांचे प्रमाणपत्र ग्राह्य

## आमदार राजेश बकाने यांच्या पाठपुराव्याला यश; हजारो कामगारांना थेट लाभाचा मार्ग मोकळा

**पुलगाव | प्रतिनिधी**

देवळी-पुलगाव विधानसभा क्षेत्रातील हजारो बांधकाम कामगारांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा व दिलासादायक निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. आता बांधकाम कामगार कल्याण मंडळामध्ये नोंदणी करण्यासाठी ठेकेदाराकडून मिळालेले ९० दिवसांचे कामाचे प्रमाणपत्र अधिकृतरीत्या ग्राह्य धरले जाणार आहे. या निर्णयामुळे नोंदणी प्रक्रियेमधील गुंतागुंत कमी होऊन प्रत्यक्षात श्रम करणाऱ्या कामगारांना शासनाच्या विविध लाभांपर्यंत पोहोचता येणार आहे.या निर्णयामागे आमदार राजेश बकाने यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रामाणिक प्रयत्न कारणीभूत ठरले आहेत. अनेक बांधकाम मजुरांनी भेडसावणाऱ्या अटी व कागदपत्रांच्या अडचणी लक्षात घेता, आमदार बकाने यांनी कामगार मंत्री मा. आकाश फुंडकर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. त्यांनी नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या दस्तऐवजांमध्ये सुलभता आणण्याची आणि प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांना त्वरित नोंदणीचा मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

याआधी नोंदणीसाठी महसूल अधिकारी, ग्रामसेवक किंवा इतर सरकारी अधिकाऱ्यांचे दाखले आवश्यक होते. मात्र, अनेक वेळा हे मिळवणे श्रमिकांसाठी अवघड ठरत होते. परिणामी, वर्षानुवर्षे बांधकामात काम करणारे मजूर देखील कल्याणकारी योजनांपासून वंचित राहत होते. मात्र, आता फक्त ठेकेदाराचे ९० दिवसांचे कामाचे लेखी प्रमाणपत्र सादर करून सहज नोंदणी करता येणार आहे.या निर्णयाबाबत बोलताना आमदार राजेश बकाने म्हणाले, हा निर्णय हे कामगारांच्या कष्टाचे अधिकृत मान्यतेचे प्रतीक आहे. शेकडो बांधकाम मजुरांना यामुळे न्याय मिळेल आणि त्यांना सरकारच्या योजनांचा थेट लाभ घेता येईल.हे प्रमाणपत्र सादर करून झालेली नोंदणी केवळ नावनोंदणीपुरती मर्यादित नसून, त्यातून कामगारांना विमा संरक्षण, अपघात निधी, आरोग्य सेवा, शिष्यवृत्ती, मुला-मुलींच्या शिक्षणासाठी मदत, निवृत्ती लाभ अशा अनेक कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येणार आहे.हा निर्णय आमदार बकाने यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे शक्य झाला असून, त्यांनी कामगारांच्या हक्कासाठी दिलेली आक्रमक आणि प्रभावी भूमिका निर्णायक ठरली आहे. हा निर्णय कामगारांप्रती असलेल्या त्याच्या बांधिलकीचे उदाहरण असून, त्यातून देवळी-पुलगाव मतदारसंघातील कामगारांचा खऱ्या अर्थाने सशक्तीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.




# नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या 'स्टडी पर्क शिष्यवृत्ती योजना' अंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व टॅब प्रदान

## वर्धा जिल्ह्यातील समर्थ शिरसकर व तूबा खान यांची निवड; गुणवत्तेला मिळाले दाद

**वर्धा | प्रतिनिधी**

नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राबविण्यात आलेल्या 'स्टडी पर्क शिष्यवृत्ती योजना' अंतर्गत वर्धा जिल्ह्यातील दोन गुणवंत विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या उपक्रमात कृषक इंग्लिश मीडियम स्कूल, आर्वी येथील समर्थ विजय शिरसकर याला ५०,००० ची शिष्यवृत्ती तर राष्ट्रीय हुतात्मा विद्यालय, आष्टी येथील तूबा कौसर मुन्तकिम खान हिला सॅमसंग टॅब देऊन गौरविण्यात आले.




ही योजना नवनीतच्या 'नवनीत २१ अपेक्षित प्रश्नसंच' या अभ्याससामग्रीवर आधारित असून विद्यार्थ्यांमध्ये स्वअभ्यासाची सवय लागावी आणि डिजिटल शिक्षणाला चालना मिळावी, या उद्देशाने देशभरात राबविण्यात आली. हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या उपक्रमात वर्धा जिल्ह्यातून दोन विद्यार्थ्यांची निवड होणे, ही त्यांची शैक्षणिक गुणवत्ता व चिकाटीची पावती आहे.

या पुरस्कार वितरणाचे कार्यक्रम संबंधित शाळांमध्ये पार पडले. कृषक इंग्लिश मीडियम स्कूल, आर्वी येथे झालेल्या समारंभात मुख्याध्यापिका प्रणिता हिवसे आणि उपमुख्याध्यापक विजय डोळस यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले. आष्टी येथील कार्यक्रमात राष्ट्रीय हुतात्मा विद्यालयाचे मुख्याध्यापक पुंडलिक गुलाबराव नागतोडे यांनी तूबा खानच्या यशाचे कौतुक केले.कार्यक्रमात नवनीत एज्युकेशन लिमिटेडचे नागपूर विभागीय व्यवस्थापक (विदर्भ) सुनील पोतदार, वर्धा जिल्हा प्रमुख नंदकिशोर शेंद्रे, सीनियर सेल्स एक्झिक्युटिव्ह सुमेध गाडगे, शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी नवनीतच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत असे उपक्रम शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणारे ठरतात, असे मत व्यक्त केले. अशा योजनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण होऊन डिजिटल शिक्षण अधिक व्यापक व प्रभावीपणे रुजेल, असा विश्वासही या वेळी व्यक्त करण्यात आला.

## सुशील हिम्मतसिंगका विद्यालयात

# स्व.शांताबाई रानीवाला व स्व.सुशील हिम्मतसिंगका स्मृतिदिन साजरा

**वर्धा | प्रतिनिधी**

स्थानिक सुशील हिम्मतसिंगका विद्यालयात स्व. शांताबाई रानीवाला व स्व. सुशील हिम्मतसिंगका यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित स्मृतिदिन कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मा तायडे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून यशवंत महाविद्यालय, वर्धा येथील मानसशास्त्र विभागाचे सेवानिवृत्त प्रमुख डॉ. के. पी. निंबाळकर, संस्था सचिव पवनजी रूईया, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर घुगे, माजी विद्यार्थिनी श्रीमती भेंडे ताई, व विद्यालयाचे पर्यवेक्षक मंगेश कोपुलवार उपस्थित होते.प्रमुख अतिथी डॉ. निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना सांगितले की, यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. कोणतीही परिस्थिती आपल्याला यशापासून दूर ठेवू शकत नाही.



संस्थेचे सचिव पवनजी रूईया यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सदैव कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापिका श्रीमती तायडे यांनी पुढील वर्षात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील असे सांगितले.

कार्यक्रमात फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या दहावी व बारावी परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या गुणवंत विद्यार्थ्यांना अतिथींच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन वर्ग दहावी ब च्या विद्यार्थ्यांनी केले होते. संचालन प्रांजली महाबुधे व गायत्री देऊळकर, तसेच वर्गशिक्षक डॉ. गिरीश वैद्य यांनी केले. कु. ऋतुजा कांबळे हिने आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# देवळीतील इनडोअर स्टेडियमचे छत कोसळले सहा महिन्यांतच निकृष्ट कामाचा पर्दाफाश


**देवळी | प्रतिनिधी**

केवळ सहा महिन्यांपूर्वी उद्घाटन झालेल्या देवळी येथील विदर्भ केसरी रामदास तडस इनडोअर स्टेडियमच्या छताचा काही भाग अचानक कोसळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, स्टेडियमच्या कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.हा प्रकल्प देवळी नगर परिषदेकडून सुमारे १४.२९ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आला होता. ए-ग्लोबिया क्रियेशन, नागपूर या संस्थेने बांधकाम व इंटेरिअरचे काम केले होते. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, त्यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत केला.

किरण ठाकरे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, नगर भवनचे सुद्धा सुरू असलेले बांधकाम निकृष्ट दर्जाच्या रेतीचा

**प्रमुख मुद्दे:**

**सहा महिन्यांपूर्वीच उद्घाटन झालेले इनडोअर स्टेडियम आता धोकादायक अवस्थेत.**
**पीओपी छताचा काही भाग कोसळला, सुदैवाने जीवितहानी टळली.**
**राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी स्पर्धाही या स्टेडियममध्ये नुकत्याच पार पडल्या होत्या.**
**महिला आणि लहान मुलांची दररोज गर्दी असलेले हे ठिकाण अपघाताला निमंत्रण देणारे ठरू शकते.**
**कोसळलेले छत अधिकाऱ्यांच्या निदर्शनासही नव्हते, हे अधिकच धक्कादायक.**



आणि चोरीचा वापर करून सुरू आहे. तक्रारी करूनही नगर परिषद डोळेझाक करत आहे.ठाकरे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे या घटनेची गंभीर दखल घेऊन स्टेडियम व नगर भवन दोन्हीच्या बांधकामाची सखोल चौकशी, स्पेशल ऑडिट तसेच तत्कालीन मुख्याधिकारी, नगर अभियंता आणि गुणवत्ता तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.युवा संघर्ष मोर्चा लवकरच नगर परिषद व संबंधित यंत्रणेविरोधात भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन उभारणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.या पत्रकार परिषदेला किरण ठाकरे, प्रवीण कात्रे, गौतम पोपटकर, स्वप्निल मदनकर, सागर पाटणकर, मंगेश वानखेडे, मनीष पेटकर तसेच संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंगणघाट तालुक्यातील कुंभी येथे हनुमान मूर्तीची विटंबना

## विहिप आणि बजरंग दल आक्रमक

**हिंगणघाट | प्रतिनिधी**

हिंगणघाट तालुक्यातील कुंभी गावात अज्ञात व्यक्तीने श्री हनुमान मूर्तीची विटंबना केल्याची घटना समोर आली आहे. आज सकाळी ही बाब गावकऱ्यांच्या लक्षात येताच परिसरात संतापाची लाट उसळली. गावकऱ्यांनी तत्काळ हिंगणघाट पोलीस स्टेशनमध्ये याबाबत माहिती दिली.घटनेची गंभीरता लक्षात घेता, ठाणेदार ठाकूर यांनी त्वरित कुंभी गावात पोहोचून चौकशी करण्यात येईल अशी ग्वाही दिली आहे. सध्या पोलिसांकडून अज्ञात आरोपीच्या शोधासाठी तपास सुरू आहे. या घटनेमुळे विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून त्यांनी या कृत्याचा तीव्र निषेध केला आहे. दोषींवर कठोर कारवाई करून लवकरात लवकर अटक करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.घटनेनंतर विहिप व बजरंग दलाचे पदाधिकारी कुंभी येथे पोहोचले. त्यांनी हनुमान मूर्तीवर पुन्हा दुपट्टा चढवून विधीवत पूजा केली.



गावकऱ्यांना धीर देत विहिप व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी, जर गावकऱ्यांना कोणतीही मदत लागली, तर आम्ही तत्पर आहोत. आमच्या पद्धतीने दोषींना धडा शिकवू, असे आश्वासन दिले.या वेळी विहिपचे वर्धा जिल्हा धर्मप्रसार प्रमुख अजय भोंग, जिल्हाप्रमुख अनुकूल कोचर, हिंगणघाट शहर मंत्री देवा वाघमारे, मठ मंदिर प्रमुख रवी खंडाळकर, सेवा प्रमुख संजय कडू, प्रचारप्रसार प्रमुख शुभम जयस्वाल, बजरंग दल सुरक्षा प्रमुख रितिक खोडे, प्रतीक हिवंज, रणजित कच्चवाहा, राहुल फंटिंग यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि ग्रामस्थ मंदिरात उपस्थित होते.

## तालुक्यात युरिया खताचा तीव्र तुटवड

# युवा संघर्ष मोर्चाच्या नेतृत्वात तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन सादर

**देवळी | प्रतिनिधी**

सध्या देवळी तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये शेतकऱ्यांना युरिया खताच्या तीव्र तुटवड्याचा सामना करावा लागत आहे. खरीप हंगामातील महत्त्वाच्या टप्प्यावर पिकांची वाढ होत असताना युरियासारख्या अत्यावश्यक खताचा पुरवठा बंद असल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. तालुक्यातील कोणत्याही कृषी केंद्रात सध्या युरिया खत उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना निराश होऊन माघारी जावे लागत आहे. यामुळे पिकांच्या वाढीवर विपरित परिणाम होत असून उत्पादनावरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. परिणामी, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते.या युरिया तुटवड्याबरोबरच कृषी केंद्रांमध्ये लिंकिंगच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट सुरु असल्याचेही स्पष्ट झाले आहे. मागणी असलेल्या युरिया खतासोबत इतर खते, औषधे किंवा बियाणे खरेदी करण्याची सक्ती केली जात आहे. अन्यथा युरिया खत देण्यास नकार दिला जातो. परिणामी, गरज नसतानाही शेतकऱ्यांना अतिरिक्त खरेदी करावी लागते आणि त्यांच्यावर आर्थिक भार वाढतो. या अन्यायकारक पद्धतीमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तालुका कृषी अधिकारी यांची भेट घेतली व शेतकऱ्यांच्या समस्या मांडत निवेदन सादर केले. या निवेदनात तालुक्यात तातडीने युरिया खताचा पुरवठा सुरळीत करण्याची, लिंकिंग पद्धत पूर्णतः बंद करण्याची आणि पारदर्शक खत वितरण यंत्रणा उभी करण्याची मागणी करण्यात आली. किरण ठाकरे यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर शासनाने याबाबत तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर युवा संघर्ष मोर्चा शेतकऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडेल.

या प्रसंगी युवा संघर्ष मोर्चाचे प्रविण कात्रे, गौतम पोपटकर, स्वप्नील मदनकर, गौरव खोपाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याचा निर्धार या वेळी उपस्थितांनी व्यक्त केला.



# ग्रामगीता महाविद्यालयात करिअर संसद शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

**चिमूर । शेषराव राऊत**

जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण मंडळ, गडचिरोली द्वारा संचालित ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथे दिनांक १५ जुलै २०२५ रोजी करिअर कट्टा या उपक्रमाअंतर्गत करिअर संसद शपथविधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात नविन नियुक्त पदाधिकाऱ्यांचा शपथविधी अत्यंत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे यांनी आभासी पद्धतीने सहभाग घेतला. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात करिअर संसद उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी अशा संधींचा योग्य उपयोग करून घेतल्यास त्यांचे व्यक्तिमत्व अधिक सक्षमपणे घडेल, असेही त्यांनी नमूद केले.या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा एस. आस्वले यांच्या अध्यक्षतेखाली शपथविधी पार पडला. कार्यक्रमास आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. निलेश ठवकर, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. संदीप सातव, रसायनशास्त्र विभागाच्या डॉ. वरदा खटी, तसेच करिअर कट्टा समन्वयक डॉ. मृणाल वऱ्हाडे यांची उपस्थिती लाभली होती.



करिअर संसद २०२५-२६ साठी नियुक्त झालेल्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांमध्ये मुख्यमंत्री म्हणून कु. सानिया वानखेडे, नियोजन मंत्री प्रीतम शेंडे, कायदे व शिस्तपालन मंत्री पल्लवी गजभे, सामान्य प्रशासन मंत्री विद्या नन्नावरे, माहिती व प्रसारण मंत्री आशिष हाडगे, उद्योजकता विकास मंत्री कु. आफरीन शेख, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री सुरेंद्र धारणे, कौशल्य विकास मंत्री कु. अल्फिया शेख, संसदीय कामकाज मंत्री पायल गराटे, महिला व बालकल्याण मंत्री कु. संचिता वैद्य, तसेच सदस्य म्हणून कु. सर्थिका बारेकर यांचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली तसेच त्यांना करिअर कट्टा डायरी व नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्या डॉ. आस्वले यांनी आपल्या भाषणात करिअर कट्टा उपक्रम हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रभावी माध्यम असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःमधील गुणवत्ता ओळखून ती अधिक विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले. डॉ. मृणाल वऱ्हाडे यांनी स्पर्धा परीक्षा व करिअर संधींबाबत उपस्थितांना माहिती दिली आणि नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शनही त्यांनीच केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा आणि त्यांना करिअरच्या दिशेने निश्चित दिशा देणारा ठरला.

## चंद्रपूर जिल्ह्यातील मद्यपरवाना मंजुरीत गैरव्यवहार?

# आ.सुधाकर अडबाले यांनी उपस्थित केला तारांकित प्रश्न

### विशेष तपास पथकास अहवाल सादर करण्यासाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दारूबंदी उठवल्यानंतर नव्याने मंजूर करण्यात आलेल्या मद्य परवान्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे. याबाबतच्या शासनाकडे अनेक तक्रारीसुद्धा करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात आमदार सुधाकर अडबाले यांनी विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला. तेव्हा उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्कमंत्री अजित पवार यांनी मद्य परवाना मंजुरीत गैरव्यवहार झाला असल्याच्या तक्रारीही शासनाकडे प्राप्त झाल्या असल्याची कबुली दिली आहे. तसेच यासंदर्भात चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विशेष तपास पथकास अहवाल सादर करण्यासाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचीही माहिती त्यांनी यावेळी दिली.

चंद्रपूर जिल्ह्यात २०१५ मध्ये दारूबंदी करण्यात आली. मात्र, ही बंदी कागदोपत्रीच होती. दारूची अवैध तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली. बनावट दारूचा पुरवठा होऊ लागला. अखेर, राज्य शासनाने १७ मे २०२१ रोजी ही दारूबंदी उठविली. मात्र, नंतर मद्य परवाने देताना मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला. नियमांची पायमल्ली करून परवाने वितरित करण्यात आले. त्यामुळे २०१५ पूर्वी असलेल्या ३१५ परवान्यांची संख्या ७५० वर पोहचली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे तत्कालीन अधीक्षक संजय पाटील, दुय्यम निबंधक चेतन खारोडे आणि अधीक्षक अभय खताड यांना १ लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. त्यामुळे गैरव्यवहाराच्या आरोपाला बळकटी आली असून, यासर्व प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी यावेळी केली.

यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, ३१ मार्च २०१५ रोजी चंद्रपूर जिल्ह्यात ५१९ अनुज्ञप्त्या कार्यरत होत्या. आता ३१ मार्च २०२५ पर्यंत ही संख्या ८४६ झाली आहे. या प्रकरणी प्राप्त तक्रारींची सखोल चौकशी करण्यासाठी १५ ऑक्टोबर २०२४ रोजी गृह विभागाच्या निर्णयानुसार विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे. या पथकाला अहवाल सादर करण्यासाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे सांगितले. एसीबीचे अपर पोलिस आयुक्त संदीप दिवाण यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. या विशेष पथकाने २०२१ नंतर मंजूर झालेल्या नव्या परवान्यांची तसेच इतर जिल्ह्यांतून स्थलांतरित झालेल्या अनुज्ञप्त्यांची व तक्रार दारांकडील दस्तऐवजांची चंद्रपुरात येऊन तपासणी केली आहे.



# अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त दीक्षाभूमी चौकात अभिवादन कार्यक्रम



**नागपूर । प्रतिनिधी**

सामाजिक परिवर्तनाचे महानायक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६व्या पुण्यतिथीनिमित्त १८ जुलै रोज शुक्रवारला नागपूर येथील दीक्षाभूमी चौकातील अण्णाभाऊ साठे स्मारक परिसरात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, विचारवंत, तरुण कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहून अभिवादन अर्पण केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विवेक विचार मंच, विदर्भ प्रांताचे पालक सुनील किटकरू आणि विदर्भ संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर उपस्थित होते.कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सुनील किटकरू म्हणाले, अण्णाभाऊ साठे यांचे जीवन म्हणजे संघर्ष, साहित्य आणि समाजप्रबोधन यांचा संगम आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजातील शोषित, वंचित, उपेक्षित घटकांचे दुःख मांडले आणि परिवर्तनासाठी विचारांची मशाल पेटवली.उपेंद्रजी कोठेकर यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजही तितकेच प्रभावी असून नव्या पिढीने त्यांचे कार्य आदर्श मानून सामाजिक समतेसाठी पुढे यावे, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विविध सामाजिक कार्यकर्त्यांनीही अण्णाभाऊंच्या कार्यावर भाष्य करत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# अपघातानंतर मोटारसायकलस्वार फरार; गंभीर जखमी महिलेच्या मुलीची पोलीस ठाण्यात फिर्याद

**शिरूर । रमेश बनसोडे**

तालुक्यातील सरदवाडी गावच्या हद्दीत सावी हॉटेलसमोर १३ जुलै २०२५ रोजी रात्री ९:४५ वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात मोटारसायकलस्वाराने भरधाव वेगात व निष्काळजीपणे वाहन चालवून एका महिलेचा गंभीर अपघात घडवून आणल्याची घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी कारेगाव येथील विदया संदीप शेवाळे (वय ४२) यांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्या आपल्या आईसोबत घरी जाण्यासाठी सावी हॉटेलसमोर रिक्षाची वाट पाहत होत्या. त्याच वेळी काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या अज्ञात चालकाने बेदरकारपणे वाहन चालवले आणि त्यांच्या आईला जोरात धडक दिली.या धडकेत त्यांच्या आई रुख्मीणी परशुराम मते यांच्यावर गंभीर परिणाम झाला असून त्यांचा डावा पायाचा खुबा, तोंडाचा जबडा, डावा हात आणि उजव्या हाताचा मनगट यांना गंभीर दुखापत झाली आहे. छातीत देखील दुखापत झाली असून त्या सध्या उपचार घेत आहेत. धडक दिल्यानंतर मोटारसायकलस्वार घटनास्थळावरून फरार झाला.या अपघातप्रकरणी गुन्हा रजिस्टर नंबर ५११/२०२५ अन्वये भारतीय दंड संहिता कलम १२५ अ, १२५ ब तसेच मोटार वाहन कायदा कलम २८१, १८४, १३४ आणि १७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार कळमकर (ब. क्र. २०७०) करत असून प्रकरणाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे आहेत.शहरात वाढत्या वाहतूक नियमांचे उल्लंघन व निष्काळजी वाहनचालकांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून पोलिसांनी अशा घटनांवर कठोर कारवाई करण्याची गरज नागरिक व्यक्त करत आहेत.

# शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्न पहा यश सदैव तुमचंच आहे–रोहन घुगे

**मुरबाड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त, प्रियजन गुण गौरव समिती मुरबाड आणि राष्ट्रवादी काँग्रेस मुरबाड तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावी परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मुरबाड येथील एमआयडीसी हॉलमध्ये उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून रोहन घुगे (आयएएस), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी प्रमोद हिंदुराव, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी लाभले होते.



कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रोहन घुगे म्हणाले, मी देखील तुमच्यासारखाच एक सामान्य विद्यार्थी होतो. शिक्षणाच्या माध्यमातून निश्चित ध्येय ठरवा, मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी मेहनत करा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांसारख्या महामानवांनी शिक्षणाच्या जोरावर इतिहास घडवला. तुम्हीही तुमच्या आत्मविश्वासाच्या बळावर जीवनात नक्की यशस्वी व्हाल.

या वेळी अध्यक्षीय भाषणात प्रमोद हिंदुराव यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करत म्हटले,पुढारी कमी, अधिकारी जास्त व्हा. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचं सर्वोच्च माध्यम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र लक्षात ठेवून पुढे वाटचाल करा. शिक्षणाच्या प्रवासात आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत.

कार्यक्रमादरम्यान, एका विद्यार्थिनीने आपल्या मनोगतात म्हटले, हा सन्मान आमच्यासाठी केवळ पुरस्कार नसून, उद्याच्या जबाबदाऱ्या आणि प्रेरणेचा आधार आहे.

या गौरव सोहळ्यात ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भरत गोंधळे, प्रदेश सचिव रविंद्र परटोले, युवक जिल्हाध्यक्ष प्रतिक हिंदुराव, महिला जिल्हाध्यक्ष कल्पना तारमळे, मीडिया सेल जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल शेवाळे, मुरबाड तालुका अध्यक्ष चंद्रकात बोष्टे, कल्याण ग्रामीण तालुका अध्यक्ष बाळाराम कोर, तसेच अरुण जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे आयोजन व समन्वय अत्यंत नेटके आणि प्रेरणादायी पद्धतीने पार पडले, ज्यामुळे उपस्थित विद्यार्थी व पालकांना एक सकारात्मक ऊर्जासंचार मिळाला.

# बोईसरच्या पाणीप्रश्नी मुख्यमंत्र्यांचा तातडीचा हस्तक्षेप; महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला ८ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश

**पालघर । नितीन बोंबाडे**

बोईसर विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांची निकृष्ट व संथ अंमलबजावणी अखेर राज्य सरकारच्या दृष्टीस पडली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. माजी आमदार राजेश रघुनाथ पाटील यांनी दिनांक १७ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांना सविस्तर निवेदन दिले होते, ज्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (माजिप्र) अंतर्गत सुरू असलेल्या विविध पाणी योजनांतील अनियमितता, अपारदर्शकता आणि गुणवत्तेच्या अभावाची माहिती देण्यात आली होती. या निवेदनात तिल्हेरसह इतर १२ गावे, केळवे-माहीमसह १८ गावे, खानिवडे-गारगावसह २२ गावे आणि सफाळे-नंदाडे या चार प्रमुख पाणीपुरवठा योजनांमध्ये होत असलेल्या हलगर्जीपणाचा उल्लेख होता. पाटील यांनी या योजनांतील कामाची अत्यंत संथ गती, दर्जेदार कामाचा अभाव आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षाचा मुद्दा ठळकपणे मांडला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि माजिप्रच्या ठाणे विभागाला तातडीने कारवाईचे निर्देश दिले आहेत. १५ जुलै २०२५ रोजी शासनाने माजिप्र ठाणेच्या मुख्य अभियंत्यांना पत्राद्वारे आदेश पाठवले असून, ८ दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयावर प्रतिक्रिया देताना माजी आमदार राजेश पाटील म्हणाले, ही कारवाई बोईसरमधील जनतेसाठी दिलासादायक आहे. संबंधित दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि या योजनांची पारदर्शक, गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी होऊन लोकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, हीच अपेक्षा आहे. राज्य शासनाच्या या तातडीच्या निर्णयामुळे बोईसर मतदारसंघातील दीर्घकालीन पाणीटंचाईच्या समस्येला लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता असून, नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# जुनासूर्ला केंद्राची पहिली शिक्षण परिषद चांदापूर हेटी येथे उत्साहात संपन्न

**मूल । प्रतिनिधी**

दि. १८ जुलै २०२५, शुक्रवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदापूर हेटी येथे जुनासूर्ला केंद्राची पहिली शिक्षण परिषद मोठ्या उत्साहात पार पडली. शिक्षण विस्तार अधिकारी श्रीरंग कुमरे यांच्या अध्यक्षतेखाली व केंद्रप्रमुख मुकुंदा गव्हारे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक भुरसे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष कुमरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्याचप्रमाणे केंद्रप्रमुख गव्हारे यांचेही मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुणे अनिल नैताम, किशोर उरकुंडवार, विनायक कांडरकर, कैलास कोसरे, केदारनाथ सोनुले, वैशाली महाकरकार व तालुका मूल्यवर्धन समन्वयक कोहळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख मुकुंदा गव्हारे यांनी केले. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात शिक्षण विस्तार अधिकारी श्रीरंग कुमरे यांनी उपस्थित शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या परिषदेत १०० टक्के निपुण शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांचा विशेष सन्मान करून त्यांना पुष्पगुच्छ व पेन प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन नंदकिशोर शेरकी यांनी केले.

दुपारी १२ वाजता चहा ब्रेकनंतर विषयवार मार्गदर्शन सत्रास सुरुवात झाली. मूल्यवर्धन संदर्भात कोहळे यांनी शिक्षकांना योग्य दिशादर्शन केले. श्री. केदारनाथ सोनुले सर यांनी मासिक नियोजन व वेळापत्रकाचे



महत्त्व पटवून दिले. विनायक कांडरकर यांनी जादूई पिटारा व निपुण महाराष्ट्र यामधील शिक्षणसाहित्याचे सविस्तर मार्गदर्शन करत प्रात्यक्षिकाद्वारे त्याचे महत्त्व स्पष्ट केले.कैलास कोसरे यांनी विद्यार्थ्यांच्या सध्याच्या शैक्षणिक पातळीचा विचार करून त्यांना सुलभ पद्धतीने मार्गदर्शन करण्याच्या तंत्राचा परिचय करून दिला. किशोर उरकुंडवार यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करून त्यांना अभिव्यक्त होण्यासाठी निबंध लेखन व वारंवार वाचनाचा सराव यावर भर द्यावा असे सांगितले.

वैशाली महाकरकार यांनी नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षा विषयक गणित विषय सुलभ व सोपा होण्यासाठी लागणाऱ्या झटपट उत्तरांची सूत्रे स्पष्ट करून दाखवली. अनिल नैताम यांनी इंग्रजी विषयाबाबत अत्यंत सहज व सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अल्फाबेट्सचे योग्य उच्चार, लहान शब्दांचे वाचन व तेथून वाक्यरचनेचा सराव करावा, अशी त्यांची सूचना होती.

या परिषदेत कुमरे गव्हारे यांनी शासकीय योजना, परिपत्रके, शाळा व्यवस्थापन व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी चांदापूर हेटी येथील टॉप मोस्ट दोन विद्यार्थ्यांचा पेन व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

शेवटी सायंकाळी ५ वाजता केंद्रप्रमुख गव्हारे यांनी उपस्थित शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे आणि शाळेच्या व्यवस्थापन समितीचे आभार मानत वंदे मातरम् गीताने शिक्षण परिषदेचा समारोप केला.

# महाराज देवस्थानात पोलीस पाटील व अधिकाऱ्यांचा सत्कार

**वर्धा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील महासंघ व सावंगी (मेघे) पोलीस स्टेशनच्या संयुक्त विद्यमाने श्री कृष्णगिरी महाराज देवस्थान, धोत्रा येथे निरोप समारंभ व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात निमगावचे पोलीस पाटील कृष्णा मरघडे, अंतरगावचे पोलीस पाटील सुभाष खोबे, पोलीस निरीक्षक संदीप कापडे, नवनियुक्त ठाणेदार पंकज वाघाडे, तसेच प्रविण शेंडे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष धनराज बलवीर, माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद महाजन, सेलू तालुका अध्यक्ष समिर डाखोळे, तसेच दहेगाव येथील माणिक नागदेवते उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पोलीस प्रशासन आणि पोलीस पाटील यांच्यातील समन्वय आणि



गावपातळीवरील कायदा-सुव्यवस्थेतील त्यांच्या भूमिकेवर सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन दिनेश घायवत यांनी केले, तर आभार महेश जे. काम यांनी मानले.

या कार्यक्रमात कमलाकर नेहारे, महेश टेकाम, रविंद्र वैद्य, सागर दाते, मोहन कुडे, वासुदेव पंधराम, वर्षा ठोंबरे, साधना थुल, पुनम मडावी, मंजुषा ओंकार, आशिष मिस्कीन, वैशाली मुगेधर, प्रशांत बलवीर, धर्मपाल ओरके, धीरज जाधव, पल्लवी आदमणे, सविता धोटे, संजू खोब्रागडे, प्रविण देवढे, सीमा कांबळे, नितेश बीडकर, प्रिया नागोसे, जयश्री वाघमारे, अरुण कुटे, सविता जुगनाके, पुरुषोत्तम टेकाम, सुधीर मिटकर, योगेश शेंडे, बबिता डोंगरे, इंद्रपाल नेहारे आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## विरोधी पक्षकाराकडून वकिलाला जिवे मारण्याची धमकी!

# वकिलांच्या सुरक्षेसाठी डव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट लागू करण्याची जोरदार मागणी

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ शहरात कायद्याचं संरक्षण देणाऱ्या वकिलांनाच आता स्वतःच्या जीवाची भीती वाटू लागली आहे. येथील वकील संघाचे उपाध्यक्ष ड. इरफान पाटील यांना एका दिवाणी दाव्याशी संबंधित विरोधी पक्षकाराने मोबाईलच्या व्हॉट्सपद्वारे अपशब्द वापरून जिवे मारण्याची धमकी दिल्याने वकिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

हा प्रकार १५ जुलै रोजी घडला असून, संबंधित पक्षकाराने मी काय करतो ते बघ अशा प्रकारचे धमकीचे शब्द वापरत घातपाताचा इशारा दिला. याआधीही अनेक वकिलांना पक्षकारांकडून अशा प्रकारचे त्रास दिले गेल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे वकिलांना काम करताना अनेकदा दबाव, धमक्या आणि असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे.



या घटनेच्या पार्श्वभूमीवर मोहोळ वकील संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांना तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे माजी अध्यक्ष तथा विद्यमान सदस्य ड. मिलिंद थोबडे यांना निवेदन सादर करण्यात आलं. या निवेदनातून वकिलांच्या सुरक्षिततेसाठी डव्होकेट प्रोटेक्शन क्ट लागू करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.या वेळी मोहोळ वकील संघाचे अध्यक्ष ड. कृष्णात चौधरी, उपाध्यक्ष ड. इरफान पाटील, सचिव ड. श्रीदेवी पाटील, खजिनदार यल्लप्पा वाघमोडे, ग्रंथपाल ड. रमेश पाटील यांच्यासह सोलापूर वकील संघाचे उपाध्यक्ष ड. रियाज शेख, सदस्य ड. राजेंद्र फताटे, ड. असीम बांगी, ड. विशाल गावडे, ड. सोनल जानराव, ड. सिरसट दादा, ड. सौदागर गुरव, ड. प्रथमेश अदलिंगे, ड. प्रेमनाथ सोनवणे, ड. विनीता गहलोत, ड. इमरान पाटील, ड. ज्ञानेश्वर ऐडगे, ड. प्रमोद जानराव, ड. वाघमारे, ड. मनोजकुमार भालेराव, ड. तुकाराम आगलावे, ड. कापूरे आदी वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.वकीलांचा ठाम इशारा म्हणजे जर शासनाने लवकरात लवकर डव्होकेट प्रोटेक्शन क्ट लागू केला नाही, तर वकील संघटना राज्यभर आंदोलन करण्याचा विचार करू शकते.

# गुणवंत विद्यार्थी व वक्तृत्व-निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा भाजप व युवा मोर्चाच्या वतीने गौरव

## पंडित शेठ पाटील व चित्राताई पाटील यांचे मार्गदर्शन; शिक्षिका चौधरी मॅडम यांचा गुरुपौर्णिमा निमित्त सन्मान

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता युवा मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या निबंध व वकृत्व स्पर्धेतील विजेत्यांचे बक्षीस वितरण सोहळा रोहा येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार पंडित शेठ पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्या चित्राताई पाटील, भाजपा दक्षिण रायगडचे उपाध्यक्ष राजेश मापारा यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या मार्गदर्शनाखाली तर नियोजन भाजयुमो



जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर यांनी केले होते.

या सोहळ्यात दहावी-बारावी परीक्षेत विशेष यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच निबंध व वकृत्व स्पर्धेतील विजेत्यांनाही पारितोषिके प्रदान करण्यात आली.

चित्राताई पाटील यांनी रायगड परिसरातील संभाव्य रोजगार संधी लक्षात घेता युवकांनी त्या अनुषंगाने शिक्षण घेण्याचे आवाहन केले, तर पंडित शेठ पाटील यांनी विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त भाषा शिकण्याचे आवाहन करत त्याद्वारे आंतरराष्ट्रीय संधी मिळवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवा वॉरियर्स जिल्हा संयोजक वैभव कुलकर्णी यांनी प्रभावीपणे केले. आभार प्रदर्शन युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे यांनी केले.

यावेळी शिक्षिका चौधरी मॅडम यांचा गुरुपौर्णिमा निमित्त विशेष सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस जयश्री भांड, भाजप नेते शैलेश रावकर, नंदेश यादव, लियाकतशेठ, यज्ञेश भांड, परेश चितळकर, अनिल घरजाळे, रिया कासार, निलेश धुमाळ, अमेय पाडगे, दीपक मोरे, राकेश चाफेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## अधिवेशनात गोहत्या प्रकरण

# गाजताच बदलापुरात ७ अवैध कत्तल खान्यांवर बुलडोझरची कारवाई!

**बदलापूर । प्रतिनिधी**

राज्याच्या विधानभवनात पावसाळी अधिवेशनात गोहत्या व गोमांस विक्रीविरोधात आवाज उठवण्यात आला आणि त्याच्या अवघ्या काही तासांतच बदलापूरमध्ये थेट कृती करण्यात आली. कुळगाव-बदलापूर नगरपरिषद आणि पोलिस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने बदलापूर गावातील सात अवैध कत्तलखान्यांवर बुलडोझर चालवत ती जमीनदोस्त केली. राज्य सरकारने देशी गायींना राज्यमाता गोमाता घोषित केल्यानंतरही शहरात सर्रासपणे सुरू असलेल्या गोहत्यांच्या विरोधात ही कारवाई निर्णायक ठरली आहे. गेल्या काही महिन्यांत बदलापूर आणि अंबरनाथ भागात गोमांसाची वाहतूक व विक्री सुरू असल्याचे अनेकदा निदर्शनास आले आहे. एका प्रकरणात गोमांस घेऊन मुंब्रा कडे जात असलेल्या व्यक्तीस सावध प्रवाशाने पोलिसांच्या ताब्यात दिले होते. तसेच बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण भागात गोवंशाचे मृत अवशेष आढळल्याचे सांगितल्यावर समाजात संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर विधानसभेत भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी गोवंश हत्या आणि गोमांस विक्रीप्रकरणी तातडीची कारवाई करण्याची मागणी केली होती. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी



विधानसभेत उत्तर देताना अशा अवैध कत्तलखान्यांवर तात्काळ कारवाई करण्याचं आश्वासन दिलं आणि त्याच दिवशी संध्याकाळी ही कारवाई प्रत्यक्षात उतरली.बदलापूर गावातील पाच तर गावाच्या वेशीवर असलेल्या दोन कत्तलखान्यांवर बुलडोझरने धडक कारवाई करत संरचना जमीनदोस्त करण्यात आली. ही माहिती मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी दिली. हे सर्व कत्तलखाने पोलिस तपासाअंती उघडकीस आले होते. पोलिसांनी दिलेल्या गोपनीय अहवालानंतर पालिकेने ही कारवाई तातडीने केली.बदलापूरमधील ही कारवाई केवळ स्थानिक नाही, तर राज्यभरातील अशा अवैध कत्तलखान्यांवरील संभाव्य कारवायांची नांदी ठरणार आहे. गोवंश संरक्षणाच्या मुद्द्यावर सरकार, पोलिस आणि प्रशासन यांची समन्वयात्मक भूमिका पुढील काळात निर्णायक ठरणार आहे, असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला.

# मातोश्रींच्या स्मृतिप्रीत्यर्थ २०० झाडांचे वृक्षारोपण-निसर्गसेवेचा एक आदर्श ठसा



**पिशोर । जावेद शेख**

निसर्गाशिवाय मानवाचे अस्तित्व शक्य नाही आणि वृक्ष हे जीवनाच्या प्रत्येक श्वासाचे मूलभूत आधारस्तंभ आहेत,या भावनेने प्रेरित होत, लेखक आणि व्याख्याते डॉ. संजय गायकवाड यांनी आपल्या मातोश्री स्व. गंगुबाई लक्ष्मणराव गायकवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २०० झाडांचे वृक्षारोपण करून एक आगळा-वेगळा सामाजिक संदेश दिला आहे. ही वृक्षलागवड पिंपरखेडा (ता. कन्नड) येथील त्यांच्या स्वतःच्या शेतजमिनीवर साकारण्यात आली.

या वृक्षारोपण कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. कैलास इंगळे (छत्रपती संभाजीनगर) यांच्या हस्ते वृक्षांचे रोपण करण्यात आले. विशेष अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. संजय शिंदे यांची उपस्थिती लाभली होती.कार्यक्रमावेळी बोलताना डॉ. संजय गायकवाड म्हणाले, वृक्षलागवड ही केवळ औपचारिकता नसून ती एक सजग नात्याची जपणूक आहे. प्रत्येक झाडामध्ये मातोश्रींच्या आशीर्वादांचा स्पर्श आहे. त्याचे संगोपन, संवर्धन आणि वाढ हे माझे वैयक्तिक कर्तव्य आहे.

या उपक्रमातून केवळ पर्यावरण रक्षणाचा संदेश नव्हे, तर मातृस्मरणाच्या पवित्र भावनेला सामाजिक कार्याशी जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न दिसून आला. वृक्षारोपणाच्या माध्यमातून मातीशी, माणसांशी आणि स्मृतींशी जुळलेले नाते अधिक दृढ करणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ब्लिंकिटच्या गोडाऊनवर शिवसेनेचा दणका!

# ऑनलाइन डिलिव्हरी, ऑफलाइन गुन्हा! ब्लिंकिटच्या 'हुक्का स्कीम'चा भांडाफोड

**नागपूर । आशिष घुमे**

शासनाने स्पष्ट बंदी घातलेल्या हुक्का व तंबाखूजन्य पदार्थांची ऑनलाईन घरपोच विक्री करणाऱ्या ब्लिंकिट कंपनीच्या नागपूरातील बेसा येथील गोडाऊनवर शिवसेनेने धडक आंदोलन करत गंभीर प्रकाराचा पर्दाफाश केला. ऑनलाइन डिलिव्हरी, ऑफलाइन गुन्हा असा हा प्रकार उघड होताच शहरात खळबळ उडाली असून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत प्रतिबंधित वस्तू जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

शिवसेना शहरप्रमुख समीर शिंदे, उपशहरप्रमुख राहुल पांडे आणि विभागप्रमुख प्रवीण कोहाड यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पार पडले. बेसा परिसरात कार्यरत असलेल्या ब्लिंकिटच्या गोडाऊनमधून अवघ्या ८-१० मिनिटांत तंबाखूयुक्त हुक्का फ्लेवर्स, स्मोकिंग कोल



व तत्सम पदार्थ ग्राहकांच्या घरी पोहचवले जात होते. या विक्रीतून शहरातील युवकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याने शिवसेनेकडून तीव्र विरोध नोंदवण्यात आला.विशेष म्हणजे, अलीकडेच नागपूर पोलीस आयुक्तालयाने ऑपरेशन थंडर अंतर्गत हुक्का पार्लर व गोडाऊनवर धाडी टाकून मोठ्या प्रमाणावर हुक्का फ्लेवर्स जप्त केले होते. मात्र अशा कारवायांनंतरही ब्लिंकिटकडून बिनधास्तपणे घरपोच हुक्का विक्री सुरू असल्याचे समोर आले. शिवसेनेच्या आंदोलनानंतर हुडकेश्वर पोलिसांनी तत्काळ गोडाऊनवर धाड टाकून सर्व बेकायदेशीर सामग्री जप्त केली. त्यानंतर कंपनीने आपला बेसा येथील गोडाऊन बंद केल्याची माहिती मिळाली आहे.या आंदोलनावेळी सुधीर कोमलकर, कमलाकर सावरकर, बंटी मेंघरे, दिव्यांश दुर्गे, राजकुमार धांडे यांच्यासह शिवसेनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलकांनी आरोग्याशी खेळणाऱ्या ऑनलाईन डिलिव्हरीला आमचा विरोध आहे! अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला.



**आपलं आरोग्य आणि समाजाची जबाबदारी या दोन्ही बाबी युवकांनी गांभीर्याने घ्याव्यात. झिंग देणाऱ्या उत्पादनांमागे काळा पैसा, आरोग्याचं नुकसान आणि कायद्याचा अपमान लपलेला असतो. ब्लिंकिटसारख्या कंपन्यांना रोखण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. आता युवकांनीही सजग होऊन विरोधात उभं राहावं, असे आवाहन त्यांनी केलं. -हर्षल शिंदे, युवा सेना कार्यकारिणी सदस्य**

# जीर्ण इमारतीत विद्यार्थ्यांचे शिक्षण! जवराबोडी शाळेला तातडीची दुरुस्ती आवश्यक

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील जवराबोडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असून, कोणत्याही क्षणी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी जीव मुठीत धरून शिक्षण सुरू ठेवल्यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे शाळेतील २१ विद्यार्थ्यांचे भविष्यही अंधारात जात असल्याचे चित्र आहे.ही शाळा चार वर्गांची असून, सध्या दोन शिक्षक कार्यरत आहेत. शाळेच्या इमारतीच्या भिंतींना मोठमोठ्या भेगा पडल्या असून, छतावरील सिमेंटचे तुकडे कोसळत आहेत. पावसाळ्यात इमारत अधिकच धोकादायक बनते. पर्यायी शिक्षण व्यवस्था नसल्यामुळे विद्यार्थ्यांना या धोकादायक इमारतीतच शिकावे लागत आहे.

मुख्याध्यापकांनी २०२३ पासून वेळोवेळी गटशिक्षणाधिकारी, तालुका शिक्षण अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्याकडे निवेदने दिली असून, इमारतीच्या दुरुस्तीचे इस्टीमेट सुद्धा सादर करण्यात आले आहे. मात्र, कोणत्याही अधिकाऱ्यांनी आजपर्यंत याकडे गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. स्थानिक आमदार आणि जिल्हा परिषद सदस्यांकडूनही केवळ आश्वासनांचीच बोळवण झाली आहे, असा आरोप ग्रामस्थ करत आहेत.गावकऱ्यांनी व्यक्त केलेली खंत म्हणजे समाजमंदिरांच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपयांचे अनुदान मंजूर केले जाते, मात्र शाळेच्या दुरवस्थेकडे सरकार आणि लोकप्रतिनिधी डोळेझाक करत आहेत.

शिक्षण हे मूलभूत हक्काचे साधन असताना त्यासाठी सुरक्षा नसेल, तर त्याचा उपयोग काय.असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. या परिस्थितीला कंटाळून ग्रामस्थांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. विद्यार्थ्यांचे प्राण धोक्यात घालून शिक्षण चालवावे लागत असेल, तर त्याची जबाबदारी कोण घेणार. हा प्रश्न आता केवळ गावकऱ्यांचाच नव्हे, तर संपूर्ण समाजाचा झाला आहे.

शासनाने या शाळेच्या स्थितीकडे तातडीने लक्ष देऊन दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अन्यथा पुढील आंदोलन तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.





## धामणगाव रेल्वे नगर परिषदेला स्वच्छतेचा सन्मान! महाराष्ट्रात ३७ वा, विभागात द्वितीय क्रमांक

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**



स्वच्छ भारत अभियान अंतर्गत झालेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये धामणगाव रेल्वे नगर परिषद महाराष्ट्र राज्यातून ३७व्या क्रमांकावर, तर विभागीय स्तरावर २० हजार ते ५० हजार लोकसंख्या गटात दुसऱ्या क्रमांकावर पोहोचली आहे. यासोबतच ओडीएफ++ (मुक्त शौचालय प्रथेसह सुधारित दर्जा) आणि एकतारांकित मानांकन शहराला प्राप्त झाले आहे.

हे यश मुख्याधिकारी पूनम कळंबे, माजी मुख्याधिकारी अमोल माळकर, शहर समन्वयक अक्षय ढोरे, स्वच्छता विभागातील अधिकारी, सर्व सफाई कर्मचारी नियमित व कराराधारित, तसेच धामणगाव शहरातील नागरिकांच्या सहकार्याचे फलित असल्याचे नगर परिषद प्रशासनाने सांगितले.

सर्वाधिक कष्ट सफाई कर्मचाऱ्यांनी केले. उन्हाळा, पावसाळा, थंडी यामध्येही त्यांनी न थांबता नित्यनेमाने शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न केले. नागरिकांकडून होणाऱ्या तक्रारी, रस्त्यांवर, नाल्यांत साचणारा कचरा या साऱ्यांचा सामना करत त्यांनी सातत्याने आपली जबाबदारी पार पाडली. परिणामी, शहराने ही गौरवशाली कामगिरी केली आहे.

मुख्याधिकारी पूनम कळंबे यांनी सर्व कर्मचारी, अधिकारी, व सफाई पथकाचे मन:पूर्वक अभिनंदन करत म्हटले, स्वच्छता ही केवळ मोहीम नसून, ती आपली जबाबदारी आहे. ही कामगिरी म्हणजे आपल्या संघटित प्रयत्नांची फळ आहे. यशाचे श्रेय संपूर्ण पथकाला आहे.

स्वच्छता निरीक्षक आकाश सोनेकर म्हणाले, ही कामगिरी माझ्या प्रत्येक सहकाऱ्याच्या अथक परिश्रमाचे प्रतीक आहे. हे यश केवळ आजपुरते मर्यादित न ठेवता पुढील वर्षांमध्येही आपण याहून उंच स्थान पटकावूया.

धामणगाव शहराच्या या यशाबद्दल नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, नगर परिषदेच्या कार्यपद्धतीचे स्वागत केले जात आहे. स्वच्छ शहराच्या दिशेने टाकलेले हे पाऊल भविष्यात आणखी सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.


## विद्यानिकेतन सीबीएसई शाळेत उत्साहात पालक सभा; विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाळा आणि पालकांमध्ये सुसंवाद आणि सहकार्य असणे गरजेचे आहे. धामणगाव एज्युकेशन सोसायटीच्या विद्यानिकेतन सीबीएसई शाळेत आयोजित पालक सभेत हा विषय प्रभावीपणे मांडला गेला.

सभेच्या अध्यक्षस्थानी धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ड. रमेशचंद्र चांडक होते. यावेळी मंचावर शाळेचे संचालक राजेंद्र जोशी, प्राचार्य रवी देशमुख, उपप्राचार्या साई निरजा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना प्राचार्य रवी देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा पालकांसमोर मांडला. नवीन स्थापनेतील 'कॉग्रो लॅब' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी राबविण्यात येणारी दशसूत्री योजना त्यांनी स्पष्ट केली.



यावेळी अनेक पालकांनी आपल्या शंका व प्रश्न मांडले. त्यावर उत्तर देताना संचालक राजेंद्र जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळा सर्वतोपरी प्रयत्नशील असून आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असे आश्वासन दिले.


सभेत शेकडो पालकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शाळेच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीचे त्यांनी कौतुक केले आणि शिक्षण क्षेत्रातील प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद दिला.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चारुलता दारोकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सागर ठाकरे यांनी केले.अध्यक्षीय भाषणात ड. रमेशचंद्र चांडक म्हणाले,विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी विकसित व्हाव्यात, यासाठी पालकांनी स्वतः जागरूक राहिले पाहिजे. शाळा आणि पालकांचे परस्पर सहकार्य हेच विद्यार्थ्यांसाठी यशाची गुरुकिल्ली आहे.

# शेलबारी गटात 'सुधीर अकलाडे लाट'-विरोधकांच्या छातीत धडकी!

**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील शेलबारी गटातील जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात सुधीर अरुण अकलाडे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर संपूर्ण गटात एकच चर्चा रंगू लागली आहे .यंदा हवा अकलाडेंचीच! गेल्या काही वर्षांत त्यांनी आपल्या निस्वार्थ सामाजिक कार्याने आणि जनतेच्या सुख-दुःखात असलेल्या सातत्याने गटात जो विश्वासार्हतेचा पायाभूत पाया निर्माण केला आहे, त्यामुळं विरोधकांच्या छातीत धडकी भरली असून राजकीय समीकरणं ढवळून निघाली आहेत.

सुधीर अकलाडे हे भाजपाच्या कडव्या कार्यकर्त्यांपैकी एक असून, त्यांच्यामागे माजी खासदार हिना गावित, माजी मंत्री विजयकुमार गावित, स्वर्गीय सुभाष सोनवणे, ज्येष्ठ नेते अरुण अकलाडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवाजीराव दहिते, युवा नेते हर्षवर्धन दहिते यांच्यासारख्या दिग्गजांचं नेतृत्व व मार्गदर्शन लाभलेलं आहे. ही पाठराखण सुधीर अकलाडे यांच्या विजयाच्या दृष्टीने निर्णायक ठरण्याची शक्यता राजकीय जाणकारांनी व्यक्त केली आहे.



सुधीर अकलाडे यांची लोकप्रियता ही निव्वळ राजकीय आश्वासनांवर नव्हे, तर त्यांच्या पारदर्शक आणि परिणामकारक कार्यशैलीवर आधारित आहे. त्यांच्या पत्नी रोहिणी अकलाडे यांनी पाच वर्षांपूर्वी धाडणे गणातून पं. स. सदस्य म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली असून, त्याच कामगिरीवर जनतेने अकलाडे कुटुंबावर पुन्हा विश्वास दाखवला आहे.

गेल्या दोन वर्षांत सुधीर अकलाडे यांनी शेलबारी गटात विविध ठिकाणी समाजमंदिरे, सभामंडप, संरक्षण भिंती, काँक्रिट रस्ते अशा अनेक विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून घेतला. धाडणे, शेणपूर, मालांजन, उंबरे, उंभर्टी, गव्हाणिपाडा, नवडणे, देगाव, शेलबारी, शेवडीपाडा, कड्याले या गावांमध्ये ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत व इतर योजनांतून कोट्यवधींच्या कामांना गती मिळाली आहे. या सर्व योजनांमधून जनतेला थेट लाभ मिळाल्यामुळे अकलाडे यांच्याविषयी लोकांमध्ये असलेला विश्वास अधिक दृढ झाला आहे.

अकलाडे यांच्या सभोवती उभ्या असलेल्या हजारो कार्यकर्त्यांची फळी ही प्रचारासाठी जमवलेली जमावबंदी नाही, तर त्यांच्या विचारांवर आणि कृतीवर विश्वास ठेवणाऱ्या समर्पित कार्यकर्त्यांची ताकद आहे. प्रचाराऐवजी प्रत्यक्ष कृती, घोषणांऐवजी भक्कम कामगिरी हेच अकलाडे यांच्या राजकीय भूमिकेचे खरे वैशिष्ट्य ठरत आहे.

शेलबारी गटातील सध्या निर्माण झालेलं राजकीय वातावरण पाहता ही निवडणूक 'काम करणाऱ्यांची विरुद्ध केवळ नाव सांगणाऱ्यांची' ठरणार आहे, हे स्पष्ट होत आहे. जनतेच्या मनात अकलाडेंविषयी असलेला आत्मीय भाव हीच त्यांच्या विजयाची सर्वात मोठी ताकद ठरणार आहे. त्यामुळे शेलबारी गटात सुधीर अकलाडे यांची 'लाट' उठली असून विरोधकांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. जनतेचा आवाज स्पष्टपणे सांगतोय यंदा आपला माणूसच हवा!

## पिशोरच्या शफेपुर भागात बोलेरोत आढळली कुजलेली हाडं आणि चरबीचे डबे; सार्वजनिक आरोग्याला धोका, गुन्हा दाखल

**पिशोर । जावेद शेख**

कन्नड तालुक्यातील पिशोर येथील शफेपुर भागात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये दुर्गंधी पसरवणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एक बोलेरो पिकअप वाहन चौकात उभे करून त्यात कुजलेली प्राण्यांची हाडं आणि चरबीने भरलेले डबे ठेवल्याची घटना १७ जुलै रोजी उघडकीस आली.या प्रकारामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला असून, तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली होती.

या प्रकरणी पिशोर पोलिसांनी फुलंब्री तालुक्यातील कुरेशी गल्ली येथील रहिवासी मोहसीन नजीर कुरेशी (वय ३० वर्षे) याच्याविरुद्ध सार्वजनिक उपद्रव आणि संसर्गजन्य रोग पसरविण्याचा प्रयत्न या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, आरोपी मोहसीन कुरेशी याने क्रमांक चक३० –इ ०९९१ या बोलेरो पिकअप गाडीतून शफेपुर भागातील वर्दळीच्या चौकात कुजलेली हाडं व चरबीयुक्त डबे ठेवले. यामुळे केवळ नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला नाही, तर सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले.या घटनेची गंभीर दखल घेत सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संजय दराडे आणि वसंत पाटील या अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला आहे.पुढील चौकशीदरम्यान आरोपीने हे हाडं आणि चरबी कुठून आणली, कोणत्या हेतूने ठेवली, याबाबत खुलासा होणे अपेक्षित आहे. स्थानिक प्रशासनाने देखील या प्रकाराकडे गांभीर्याने पाहत स्वच्छता व निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया तत्काळ हाती घेतली आहे.

## करमाळा तालुक्यातील ८,८३० शेतकऱ्यांना मिळणार २३ कोटींची नुकसानभरपाई आ.नारायण पाटील यांचा प्रयत्न यशस्वी

**सोलापूर । प्रतिनिधी**

मागील महिन्यात अवकाळी पावसाने करमाळा तालुक्यात थैमान घातले होते. केळी, कांदा, डाळींब, मका, उडीद अशा महत्त्वाच्या पिकांसह अनेक शेतकऱ्यांचे संपूर्ण उत्पन्न वाया गेले. याशिवाय अनेक शेतकऱ्यांची घरे कोसळली, जनावरे दगावली आणि आर्थिक दृष्ट्या शेतकरी संकटात सापडले. या पार्श्वभूमीवर आमदार नारायण आबा पाटील यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश येत शासनाने तब्बल २३ कोटी २२ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे.

या निर्णयामुळे करमाळा तालुक्यातील एकूण ८,८३० शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, काही शेतकऱ्यांच्या खात्यावर भरपाईची रक्कम आधीच जमा झाली आहे, तर उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात पुढील काही दिवसांत रक्कम जमा केली जाणार असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची गंभीर दखल घेत आमदार पाटील यांनी तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी केली होती. कृषी आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसह त्यांनी पंचनामे करून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सविस्तर निवेदन सादर केले होते. यावर सकारात्मक प्रतिसाद देत शासनाने नुकसानभरपाईसाठी मोठी तरतूद जाहीर केली.ही नुकसानभरपाई केवळ आर्थिक मदत



नसून शेतकऱ्यांच्या नव्या सुरुवातीसाठीचा हात आहे. निसर्गाच्या माराने हादरलेल्या शेतकऱ्यांना ही रक्कम जगण्याची नवी आशा देणारी ठरणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे करमाळा तालुक्यातील शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमीच तत्पर राहणारे आमदार नारायण पाटील यांनी यापुढील काळातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले असून, शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

## भात लावणी महोत्सव ठरला शेतकऱ्यांसाठी पर्वणी–सामूहिक शेतीला मिळतोय ब्रँडचा दर्जा

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

रोहा तालुक्यातील निवी गावातील युवा कृषी उद्योग या तरुण शेतकरी गटाने भात लावणी महोत्सवाच्या माध्यमातून सामूहिक शेतीचा एक प्रभावी आदर्श निर्माण केला आहे. तीन दिवस चाललेल्या या लावणी महोत्सवात विविध संस्था, कृषी विभाग आणि स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. लायन्स क्लब ऑफ रोहा, बळीराजा फाऊंडेशन यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमी संस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

मेव्हणीच्या ताटी, खोबऱ्याची वाटीअशा पारंपरिक लावणींच्या सुरांत भात लागवडीचं वातावरण भारावून गेलं होतं. शेतीत चिखलात रुतूनही चेहऱ्यावर हसू आणि कामातला आनंद हीच होती महोत्सवाची खरी ओळख.



सहा एकर क्षेत्रावर 'कर्जत ९', 'रत्ना', 'ज्योतिका' या भाताच्या जातींची लागवड करण्यात आली असून, चारसूत्री दोरी लावणी तंत्राचा वापर करून ही भातशेती आधुनिक पद्धतीने साकारण्यात आली आहे. कृषी विभागाचे अधिकारी महादेव करे व सहाय्यकांनी स्वतः शेतात उतरून लावणीत भाग घेतला, हे या उपक्रमाचं विशेष आकर्षण ठरलं.बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी यावेळी बोलताना सांगितले की, कृषी अधिकारी हा केवळ योजनांचा पाठ गिरवणारा नसून तो कृतीशील असावा, हे महादेव करे यांच्या सहभागातून स्पष्ट होतं.सामूहिक शेती आनंददायी शेती' या घोषवाक्याखाली कार्यरत असलेल्या या तरुण गटाने यापूर्वी उन्हाळी हंगामात कलिंगड व भाजीपाला लागवडीचे प्रयोग यशस्वी केले आहेत. आता त्याच शेतीत पावसाळी भात लागवड करण्यात येऊन भात लावणी महोत्सव साजरा करण्यात आला. ही शेती म्हणजे प्रयोगशीलतेचा उत्सवच ठरला आहे.कृषी अधिकारी महादेव करे यांनीही आपली प्रतिक्रिया देताना सांगितले की, निवी गावातील युवा शेतकऱ्यांनी सामूहिक शेतीतून शेतीकडे तरुणांचा ओढा वाढवून दाखवून दिला आहे. कृषी विभागाच्या वतीने आम्ही या उपक्रमास सर्वतोपरी सहकार्य करणार आहोत.लायन्स क्लबचे अध्यक्ष लक्ष्मण शिटयाळकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीही चिखलामध्ये स्वतः उतरून भात लावणीचा अनुभव घेतला. स्थानिक संस्था, प्रशासन आणि शेतकरी यांचं हे एकत्रित प्रयत्न भविष्यातील शाश्वत शेतीसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत, अशी भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.

या महोत्सवातून निवी येथील युवा कृषी उद्योग' गटाने सामूहिक शेती'ला एक ब्रँडची ओळख मिळवून दिली आहे आणि कृषी क्षेत्रात नव्या शक्यतांना उभारी दिली आहे.